# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३६/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. अर्जुन वसंत मांडवकर,<br>गट नं. १७८/१७९, कबनूर,<br>इचलकरंजी, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर. | अपेलंट |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,<br>कोल्हापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी,<br>इचलकरंजी, जिल्हा–कोल्हापूर.<br><br>३) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>ग्रामीण उपविभाग, इचलकरंजी(आर),<br>जिल्हा–कोल्हापूर.<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–**
१) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. अर्जुन मांडवकर, रा. कबनूर, इचलकरंजी यांनी पॉवरलुम व्यवसायासाठी नवीन कनेक्शन न मिळाल्याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे विहीत नमुन्यांत तक्रार नोंदविली होती. त्याकामी कक्षाने दिनांक १७–७–२००७ रोजी दिलेला आदेश मान्य न झाल्याने ग्राहकाने प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

श्री. मांडवकर यांची एकमेव तक्रार अशी की त्यांनी दि. १७–३–२००७ रोजी सर्व कागदपत्राची पूर्तता करून १९ एच.पी. चे कनेक्शन मिळण्यासाठी वि.प.कडे अर्ज केला होता. त्यानंतर ग्राहकाने सततचा पाठपुरावा करूनही त्यांना पॉवरलुम व्यवसायासाठी अद्यापि नवीन वीज कनेक्शन मिळालेले नाही. सदरचे विद्युत कनेक्शन न मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी त्यांना विना विलंब वीज कनेक्शन मिळावे.

प्रकरणी सुनावणीची तारीख ५–१०–२००७ रोजी विभागीय कार्यालय, इचलकरंजी येथे नेमली होती. सदरचेवेळी श्री. अर्जुन मांडवकर हे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांचेवतीने श्री. पी.व्ही कांबळे, नोडल ऑफीसर, मंडळ कार्यालय, कोल्हापूर, श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, इचलकरंजी, श्री. शिंदे, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग इचलकरंजी व श्री. मारूळकर, कनिष्ठ अभियंता, इचलकरंजी हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी श्री. अर्जुन मांडवकर यांनी असे सांगितले की त्यांनी दि. १७–३–२००७ रोजी सर्व कागदपत्राची पूर्तता करून त्यांच्या पॉवरलुम व्यवसायासाठी १९ एच.पी. चे नवीन वीज कनेक्शन मिळण्यासाठी वि.प. कडे विनंती केली होती. तथापि त्यास अद्यापि मंजुरी मिळालेली नाही. परिणामी त्यांना अद्यापि नवीन वीज कनेक्शन मिळालेले नाही. दरम्यानचे कालावधीत त्यांनी या व्यवसायासाठी काढलेल्या कर्जावरील व्याज वाढून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. कक्षाने दि. १७–७–२००७ रोजी पारीत केलेल्या आदेशामध्ये " कार्यकारी अभियंता यांनी योजना बनवून व त्यास मान्यता देऊन ग्राहकास वीज जोडणी लवकरांत लवकर द्यावी " असे नमूद केलेले असतांना तुम्हास मंचामध्ये प्रस्तुतचे अपील दाखल करावेसे कां वाटले ? असे श्री. मांडवकर यांना मंचाने विचारणा केली. त्यावेळी त्यानी असे सांगितले की कक्षाने नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा घालून दिलेलेली नव्हती. मोघममध्ये " लवकरांत लवकर " वीज जोडणी द्यावी असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांना मंचाकडे दाद मागणे भाग पडले आहे. तरी विना विलंब नवीन वीज कनेक्शन मिळावे अशी मंचास विनंती केली.

वि.प. यांचेवतीने श्री. शिंदे, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग इचलकरंजी यांनी असे सांगितले की ग्राहकाने १९ एच.पी.चे नवीन वीज कनेक्शन मिळण्यासाठी दि. १७–३–२००७ रोजी केलेला अर्ज वीज कंपनीस प्राप्त झाला आहे. तथापि ग्राहकाने मागणी केलेल्या१०० एच.पी.चे ट्रान्सफॉर्मर सध्या ११६ चा लोड असल्याने तेथून त्यांना वीज कनेक्शन देणे अडचणीचे आहे. शिवाय श्री. मांडवकर यांचे मागणी अगोदर दोन ग्राहकांची ३+७=१० एच.पी. ची मागणी वीज कंपनीकडे प्रलंबित आहे. त्याचा विचार करून कार्यालयाने Power Integrated Electrification ची योजना तयार करून प्रधान कार्यालयाकडे पाठविली आहे. त्यामध्ये जवळजवळ २५० ग्राहकांची मागणी सामील आहे. दरम्यानचे काळात ग्राहकास नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी वि.प.ने प्रयत्न करून रोहित्र तसेच A.B. स्वीच उपलब्ध केले आहे. याकामी मंडल कार्यालयांतून डिस्ट्रीब्यूशन बॉक्स मिळाल्यास ग्राहकास एक महिन्याचे आंत कनेक्शन देण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे असे श्री. शिंदे यांनी शेवटी सांगितले. सुनावणीचेवेळी उपस्थित असेलेले श्री. कांबळे, नोडल ऑफीसर, तथा कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी ग्राहकाची निकड विचारांत घेऊन तांतडीने डिस्ट्रीब्युशन बॉक्स देण्याचे मान्य केले. वि.प.यांनी ग्राहकास एक महिन्याचे आंत नवीन कनेक्शन देण्याचे मान्य केल्यावरून व त्यास आपली हरकत नसल्याचे श्री. मांडवकर यानी सांगितल्यावरून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वि.प. यांनी कबुल केल्या प्रमाणे या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याचे आंत ग्राहकास नवीन वीज कनेक्शन द्यावे व तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार मंचास दि. २५–११–२००७ पर्यंत कळवावे.

२. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| ( एस.आर बांबळे ) | ( जी. सी. लेले ) | ( के. व्ही. पाटील ) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |